| | | |
|---|---|---|
| | रावेर पोलीस स्टेशन<br>फोन नंबर ०२५८४-२५०३३३<br>**Email Id :-** raverpi2@gmail.com | |
| रावेर पोलीस स्टेशन | जावक क्रमांक - /२०२५ | दिनांक :- ०७/१२/२०२५ |

**प्रेस नोट**

**मा.संपादक सो.**

------------

# रावेर शहरातील रथ यात्रेतुन एका सोन साखळी चोरणाऱ्या महीलेस पकडले..

रावेर पोलिस स्टेशन येथे दि. ०८-१२-२०२५ रोजी गुरंन ४८०/२०२५ भा.न्या.संहीता कलम ३०३ (२) प्रमाणे गळयातील मंगळसुत्र (पोत)चोरीचा गुन्हा दाखल होता.

सदर गुन्हयात फिर्यादी नामे पल्लवी विशाल पाटील रा. शिवाजी चौक रावेर हे दि. ०५/१२/२०२५ रोजी रावेर शहरात सालाबादा प्रमाणे होणाऱ्या रथ यात्रेत दर्शनाकरीता आले असता गर्दीचा फायदा घेत त्यांच्या गळयातील दिड ग्रॅम वजनाचे मंगळसुत्र हे चोरीस गेले होते. त्यांनी मंगळसुत्राचा परीसरात त्याचा शोध घेतला असता त्यांना मिळुन आले नाही परंतु त्याच परीसरात उभे असलेल्या सौ. राजश्री चौधरी व रोहीणी भिडे यांच्या गळयातील मंगळसुत्र चोरीस गेल्याचे लक्षात आल्याने त्यांनी सर्वांनी मिळुन रावेर पोलिस स्टेशन ला अज्ञात इसमा विरुध्द गुन्हा दाखल होता.

सदर गुन्हा दाखल होताच गुन्हयाच्या एकंदर तपासात मा. पोलिस निरीक्षक सो यांनी रावेर गुन्हे शोध पथकास सुचना दिल्यावरुन आरोपीताच्या शोधास संपर्ण भागातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. परंतु गर्दीचा फायदा घेत सदरची महीला ही पसार झालेली होती व सीसीटीव्ही फुटेज मध्ये महीलेचा चेहरा स्पष्ट दिसत नव्हता त्याचवेळेस गुन्हे शोध पथकाने रथ यात्रेत सहभागी लोकांकडुन त्याचवेळेस काढण्यात आलेल्या मोबाईल शुटींग , फोटो शोधले त्यात एका व्हिडीओ मध्ये महीलेचा चेहरा, राहणीमान स्पष्ट दिसले होते. सदर गुन्हयाच्या तपासात गुन्हे शोध पथकाने संपर्ण यात्रे मध्ये संशयीत महीलेच्या वर्णणाची महीलेस शोधकार्य चालु केले काही काळानंतर सदर ची महीला ही संशयीत रित्या फिरतांना आढळुन आली तिने तिला विश्वासात घेवुन विचारपुस केली असता तिने गुन्हयाची कबुली देत गुन्हयातील मुद्येमाल काढुन दिला असुन सदर चा मुद्येमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर महीलेचे नाव- संजना रोहेल शिंदे वय- २० वर्ष रा. हसनाबाद ता. भोकरदन जि.जालना ह.मु. मोहसर जि.ठाणे येथील रहीवासी आहे. सदर महीलेवर पुढील योग्य ती कारवाई करण्यात आलेली आहे.
आरोपीताकडुन अजुन गुन्हे घडले आहे काय ? या बाबत पुढील तपास चालु आहे.

सदर कार्यवाही ही मा. डॉ. श्री महेश्वर रेड्डी सो पोलिस अधिक्षक जळगांव , मा. श्री अशोक नखाते सो अप्पर पो. अधिक्षक जळगांव विभाग, मा.श्री अनिल बडगुजर सो पोलिस उपअधिक्षक फैजपुर विभाग यांच्या मार्गदर्शनाने पोलिस स्टेशन रावेर मधील पो.नि.डॉ विशाल जयस्वाल , स.पो.नि. मिरा देशमुख गुन्हे शोध पथकातील, पो.ना. कल्पेश आमोदकर, पो.शि. विशाल पाटील , श्रीकांत चव्हाण , भुषण सपकाळे , सुकेश तडवी, , तथागत सपकाळे , संभाजी बिजागरे , मपोशि. पुजा साळी यांनी आरोपीताचा शोध घेतला असुन गुन्हयाचा पुढील तपास स.पो.नि. मिरा देशमुख ह्या करीत आहेत.

s/d

(डॉ. विशाल जयस्वाल)
पोलिस निरीक्षक
रावेर पोलिस स्टेशन